# “जाहिर निवेदन”

## जन्म नोंदणीत बाळाचे/नागरीकांचे नाव समाविष्ट करणे बाबत.

मा.उपसंचालक, आरोग्य सेवा तथा उपमुख्य निबंधक, जन्म मृत्यु, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र जा.क्र. आमाजीआ /कक्ष-८३/नाव समाविष्ट/१०३३७-१०४३८/ २०१२, दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ चे अनुषंगाने नाशिक महानगरपालिका क्षेत्रातील तमाम नागरीकांना या जाहिर निवेदनाद्धारे कळविणेत येते की, जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १४ व महाराष्ट्र जन्म मृत्यु नियम २०००, नियम क्र.१० नुसार जन्म नोंदणी मध्ये नोंदणी दिनांकापासून १५ वर्षापर्यंत बाळाच्या नावाची नोंद करण्याची तरतुद आहे.

तथापि, मा.केंद्र शासनाच्या निर्देशान्वये नागरीकांच्या नावाची नोंद त्यांच्या जन्म नोंदणीत करण्यासाठी ३१.१२.२०१४ या तारखेपर्यंत १५ वर्षाच्या कालावधी शिथिल करण्यात आला आहे. जन्म नोंदणीत नाव समाविष्ट करण्यासाठी खालील बाबींचे नागरीकांनी अवलोकन करावे.

१. ज्या नागरीकांची जन्माची नोंदणी ०१.०१.२००० पुर्वी झालेली आहे, अशा सर्व नागरीकांना या संधीचा लाभ देण्यात येत आहे. यामध्ये सन १९६९ पुर्वीच्या नोदणीचा सुध्दा समावेश आहे.

२. संबंधीत व्यक्ती अथवा त्यांचे पालक यांनी बाळाचे नाव समाविष्ट करणे बाबतचा अर्ज सादर करावा.

३. नावाच्या शाबीतीकरीता कुठलाही एक शासकीय पुरावा उदा.शाळा सोडल्याचा प्रमाणपत्र, एस.एस.सी.प्रमाणपत्र, पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड इ.ची प्रत द्यावी.

४. बाळाचे संपुर्ण नाव लिहिण्यात यावे.

५. बाळाचे नाव समाविष्ट झाल्यानंतर हे नाव बदलता येणार नाही.

६. काही धर्मामध्ये आई वडील यांचे आडनावापेक्षा बाळाचे आडनाव वेगळे ठेवण्याची प्रथा असते. तसेच बाळाचे मधले नाव वडीलांच्या नावापेक्षा वेगळे असते. अशा प्रकरणांत अर्जामध्ये तसा स्पष्ट उल्लेख नमुद करावा.

७. दिनांक ३१.१२.२०१४ या तारखेनंतर हा कालावधी कुठल्याही परिस्थितीत वाढवून मिळणार नाही.

तरी, नागरीकांनी त्यांचे/बाळाचे नाव जन्म नोंदणीत समाविष्ट करण्यासाठी व अधिक माहितीकरीता आपले कार्यक्षेत्रातील महानगरपालिका विभागिय कार्यालय, जन्म मृत्यु उपनिबंधक यांचेशी संपर्क साधावा.

आरोग्य वैद्यकिय अधिकारी,
नाशिक महानगरपालिका, नाशिक

आयुक्त,
नाशिक महानगरपालिका, नाशिक